# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 17.11.2012 (दि.12/11/2012 ची तहकुब का.प.क्र.18) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शनिवार दिनांक 17.11.2012 रोजी (दिनांक 12.11.2012 ची तहकूब सभा का.प.क्र.18) मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दूपारी 4.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.उपआयुक्त (प्र) श्री.रविंद्र निकम, प्र.नगर सचिव श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
02. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
03. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
04. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
05. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
06. स. श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन

**चर्चा :**

**श्री.नारायण कुचे** : मा.महापौर यांना दिलेले (ॲम्बेसेडर कार) वाहन नेहमी बंद पडत आहे. अशा प्रकारचा मा.महापौरांचा अपमान होत असेल तर ते योग्य नाही. खुलासा करण्यात यावा.

**उपअभियंता (यांत्रिकी)** : ॲम्बेसेडर कार कंपनी कडुन नविन खरेदी केलेली आहे. पहिल्या दिवशी बंद पडल्यानंतर पहिली सर्व्हिसिंग करून आणण्यात आले होते त्या नंतर मी स्वत: तपासणी केली सर्व ओके होते परंतु आता पुन्हा दुसऱ्यांदा बंद पडलेली आहे. याबाबतीत स्वत: कंपणीकडे जाऊन वाहनाची तपासणी करून वाहनाबाबत संपुर्ण माहिती घेण्यात येईल.

**शहर अभियंता** :तातडीने संबधीत कंपनीशी संपर्क साधुन वाहन सुस्थितीत करण्याचा ताबडतोब प्रयत्न करण्यात येईल.

**मा.सभापती** : मा.महापौरांच्या वाहनांची पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. याबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

**श्री.रेणुकादास वैद्य** :महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. परिस्थिती सुधारण्यासाठी वारंवार मा.पदाधिकारी, प्रशासनाच्या बैठका आयोजित केले जातात. व्यवसायिक टॅक्स नियमानुसार लावले जाते परंतु गरीब जनतेला विनाकारण जास्तीचा टॅक्स लावला जातो. परंतु लॉन, हॉटेल मोठेमोठे व्यवसायिक यांना मोठया प्रमाणात टॅक्स लागला पाहिजे परंतु त्या ठिकाणी कमी प्रमाणात टॅक्स लागला जातो. सदरची जबाबदारी कुणाची आहे खुलासा करण्यात यावा.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :शहरातील मंगल कार्यालयांना कमी प्रमाणात टॅक्स लागलेला आहे. शहरातील दवाखाने आणि मंगल कार्यालय किती या बाबत माहिती देण्यात यावी. ॲम्बेसेडर हॉटेलला किती टॅक्स लागला. शहरात हॉटेल किती माहिती

द्यावी.

प्रभाग अधिकारी-फ :ॲम्बेसेडर हॉटेलला कमी टॅक्स लागलेला आहे आणि तो जुना टॅक्स लागलेला आहे. रिवाईझ टॅक्स लागलेला नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :बीडबायपास भागात टॅक्स आकारणी झालेली नाही. ताज हॉटेलला किती टॅक्स लागलेला आहे.

प्रभाग फ अधिकारी :टॅक्स आकारणी करण्यात आलेली आहे. पुढील बै्ठकीत माहिती घेऊन सादर करण्यात येईल.

वार्ड ब अधिकारी :रूपये 2 लाख 83 हजार रूपये ताज हॉटेलला टॅक्स लागलेला आहे. प्रोझोन मॉलला 1 कोटी 34 लाख टॅक्स आकारलेला आहे. वगळण्याबाबत विनंती केलेली आहे. समायोजनसाठी संचिका विभागात आलेली आहे.

श्री.शेख अब्दुल असद :शहरात मोठया प्रमाणात मॉल, लॉन, हॉटेल, मंगल कार्यालय आहेत त्यांना खुप कमी प्रमाणात टॅक्स आकारण्यात आलेला आहे.

उपअभियंता (श्री.अफसर सिद्दीकी) :550 रनिंग मिटरपर्यंत रस्ता तयार केलेला आहे. 7 कोटी खर्च झालेला आहे. कराराप्रमाणे 1100 रनिंग मिटरपर्यंत रस्ता करणे आवश्यक होते. झालेला खर्च वार्षिक टॅक्समध्ये समायोजन करण्यासंदर्भात आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :1100 मिटरचे अंदाजपत्रक कुणी तयार केले.

उपअभियंता (श्री.अफसर सिद्दीकी):महानगरपालिकेने मान्य केल्यानुसार थर्डपार्टीकडुन केले आहे. त्यांना परवडणारे नाही म्हणुन सांगण्यात आले. करारामध्ये नमुद केले आहे की, परवडणारे असेल तर 1100 रनिंग मिटरपर्यंत रस्ता तयार करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :महानगरपालिकेचे हित जोपासायला पाहिजे. याबाबतची संपुर्ण माहिती मागविण्यात आलेली आहे सभागृहाला माहिती देण्यात येईल.

श्री.बाळासाहेब मुंडे :पुढील सभेत शहरात मॉल,लॉन, हॉटेल, मंगलकार्यालय किती याबाबतची माहिती मिळावी.

मा.सभापती :माहिती देण्यात यावी.

शहर अभियंता :शिलाई मशिनचा अहवाल आलेला आहे. मशिन वाटप करण्याचा आदेश झालेला आहे.

कक्ष प्रमुख (म.व बा.क. समिती) : महिला व बालकल्याण अधिकारी सध्या बाहेरगावी गेलेल्या आहेत त्या आल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद